दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२ । किंमत - २ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शुक्रवार । २९/०५/२०२६ । पाने -६



अधिक मास अधिक खास
चांदीच्या जोडवी 100% मजुरीवर सूट
ऑफर कालावधी - १७ मे ते १५ जून २०२६
काजळे ज्वेलर्स
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा... राजेन्द्र


# विठ्ठल मंदिर समाधी भूमिपूजन वादात

## मंदिर बळकविण्याचा प्रयत्न, शिष्यांचा आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरालगतच्या अकोले- बायपास रोडवरील विठ्ठलनगर येथील विठ्ठल मंदिर आणि ह.भ.प. किसन महाराज हारदे आश्रम परिसरात येत्या ३० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कथित साधी भूमीपूजन कार्यक्रमावरून मोठा वाद निर्माण झाला असून, या कार्यक्रमाला ह.भ.प. किसन महाराज हारदे शिष्य मंडळाने तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर कार्यक्रम पूर्णपणे अनधिकृत असून, प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करून तो रोखावा; अन्यथा व्यापक लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिष्य मंडळाने दिला आहे.

याबाबत शिष्य मंडळाच्या वतीने अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर लेखी निवेदन सादर करण्यात आले असून, या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या निवेदनाच्या प्रती संगमनेरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस उपअधीक्षक तसेच गुंजाळवाडी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना देण्यात आल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, विठ्ठलनगर येथील विठ्ठल मंदिर परिसरात दि. ३० मे २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता दिवंगत ज्ञानेश्वर महाराज जाधव यांच्या कथित समाधीचे भूमीपूजन आयोजित करण्यात आल्याचे फ्लेक्स बोर्ड मंदिर परिसरासह गावातील विविध ठिकाणी लावण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या फलकांवर हा कार्यक्रम ह.भ.प. किसन महाराज हारदे शिष्य मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येत असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

मात्र शिष्य मंडळाने या दाव्याचे स्पष्ट खंडन केले असून, आमच्या मंडळाने असा कोणताही कार्यक्रम आयोजित केलेला नाही.

काही अज्ञात व्यक्तींनी मंडळाच्या नावाचा गैरवापर करून हे फलक लावले असून, समाजात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

शिष्य मंडळाच्या म्हणण्यानुसार, संबंधित जागेच्या वारसाहक्काबाबत न्यायालयात आर.सी.एस. क्रमांक १६९/२०१५ अन्वये दावा दाखल करण्यात आलेला असून, तो सध्या प्रलंबित आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना वादग्रस्त जागेवर समाधी भूमीपूजनासारखा कार्यक्रम आयोजित करणे हे संशयास्पद असून, काही व्यक्तींकडून जागेवर ताबा मिळवण्याच्या हेतूने हा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही मंडळाने केला आहे.

यामुळे प्रशासनाने कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

(पान ४ वर)

**ह. भ. प. किसन महाराज हारदे यांनी लोकांच्या देणगीतून व स्थानिक लोकांनी दिलेल्या जागेमध्ये सन १९८८ मध्ये विठ्ठल मंदिर व आश्रम उभा केला. त्यानंतर महाराजांनी त्यांच्या मृत्युपत्रामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचे शिष्य श्री. ज्ञानेश्वर महाराज जाधव यांच्याकडे सदर आश्रम व मंदिराचे धार्मिक कार्य अशाच प्रकारे पुढे चालू राहिल यासाठी ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज जाधव यांची उत्तर अधिकारी म्हणून नेमणूक केली. परंतु माऊली महाराज जाधव यांच्या अचानक निधनामुळे त्यांच्या घरचे लोक व त्यांना साथ देणारे काही बाहेरील मंडळी यामुळे तेथे वाद निर्माण झाला. मात्र येथील ग्रामस्थांनी संगमनेर न्यायालयात हे मंदिर सार्वजनिकच रहावे यासाठी कोर्टात दाद मागितली आहे. सदर मंदिरात स्थानिक नागरिकांच्या भावना जोडलेल्या आहेत त्यामुळे बाहेरील हस्तक्षेप सहन केला जाणार नाही.**

**ह. भ. प. हारदे महाराज यांचे शिष्य गण**

# शेतकरी संरक्षण कायद्यासाठी राज्यस्तरीय समितीकडून मसुदा तयार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यात शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र कायदा अस्तित्वात यावा या उद्देशाने राज्यस्तरीय समितीमार्फत शेतकरी संरक्षण कायदा २०२६ चा संदर्भीय मसुदा तयार करण्यात आला आहे. विविध देशांतील कृषी संरक्षण व्यवस्थेचा सखोल अभ्यास करून हा मसुदा तयार करण्यात आला असून, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, नैसर्गिक संकटे आणि आर्थिक असुरक्षितता लक्षात घेऊन कायद्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

या समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ कृषी वैज्ञानिक डॉ. मुकुंदराव गायकवाड असून सदस्य म्हणून संभाजीनगर उच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील ड. अजितराव काळे, प्रदेशाध्यक्ष अशोक सब्बन तसेच माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे यांनी काम पाहिले. समितीने आतापर्यंत चार बैठका घेऊन विविध स्तरांवर माहिती संकलित केली आणि त्यानंतर सविस्तर मसुदा तयार करण्यात आला. डॉ. मुकुंदराव गायकवाड यांनी अमेरिका, इस्रायल, नेदरलँड्ससह विविध देशांतील शेतकरी संरक्षण कायद्यांचा अभ्यास करून तब्बल ५०० पानी संदर्भीय अहवाल तयार केला. त्यातून भारतीय शेतकऱ्यांच्या परिस्थितीला पूरक ठरतील अशा महत्त्वपूर्ण निष्कर्ष आणि शिफारसींचे ४० पानी स्वतंत्र दस्तऐवज तयार करण्यात आले आहेत.

- समितीच्या निरीक्षणानुसार, जगातील अनेक देशांमध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी संरक्षणात्मक कायदे अस्तित्वात असताना भारतात मात्र शेतकरी आत्महत्या वाढत असूनही स्वतंत्र संरक्षण कायदा नसणे ही गंभीर बाब आहे. बैठकीत माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे यांनी ग्राहक संरक्षण कायदा, पत्रकार संरक्षण कायदा, डॉक्टर व दवाखाना संरक्षण कायदे तसेच वन्य प्राण्यांसाठी संरक्षणात्मक कायदे अस्तित्वात असताना देशातील अन्नदात्या शेतकऱ्यांसाठी कोणताही संरक्षण कायदा नसल्याची खंत व्यक्त केली. ॲड. अजितराव काळे यांनी शेतकरी संरक्षण कायदा २०२६ अंतर्गत विविध कलमांचा मसुदा तयार केला असून, त्यात जोखीम व्यवस्थापन, अतिवृष्टी, ढगफुटी, दुष्काळ, बिबट्याचे हल्ले, सर्पदंश यांसारख्या नैसर्गिक व आकस्मिक संकटांबाबत विशेष तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. (पान ४)

# ब्लास्टिंगच्या दहशतीने हादरले वडझरी खुर्द

## खाण माफियांविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील वडझरी खुर्द परिसरात सुरू असलेल्या खाणकाम, ब्लास्टिंग आणि स्टोन क्रेशरच्या वाढत्या दहशतीविरोधात आता ग्रामस्थांनी थेट संघर्षाची भूमिका घेतली असून, मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे. ग्रामपंचायतीने संबंधित स्टोन क्रेशर चालकाला अधिकृत नोटीस बजावत गंभीर नियमभंग, ग्रामस्थांचे नुकसान आणि निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाबाबत स्पष्ट आक्षेप नोंदवले असतानाही खाणकाम सुरूच असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

वडझरी खुर्द ग्रामपंचायतीने दिलेल्या नोटीसमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण तक्रारीनंतर

करण्यात आलेल्या पाहणीत संबंधित स्टोन क्रेशरवर मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग होत असल्याचे आढळून आले. या सततच्या स्फोटांमुळे गावातील अनेक घरांना, इमारतींना तडे गेले असून नागरिकांच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

याचबरोबर परिसरातील विहिरी, बोअरवेल आणि नैसर्गिक पाणी स्रोतांवरही गंभीर परिणाम झाला असून अनेक ठिकाणी पाणीपातळी कमी झाल्याची नोंद आहे. सततच्या ब्लास्टिंगमुळे नागरिक भयभीत झाले असून गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचे ग्रामपंचायतीने आपल्या नोटीसमध्ये नमूद केले आहे. शासनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित स्टोन क्रेशरला देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र (छजउ) रद्द करण्याचा इशाराही ग्रामपंचायतीने दिला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, भविष्यात होणाऱ्या सुरत-हैदराबाद महामार्गाच्या मार्गात मोठ्या प्रमाणावर खाणकाम सुरू असून गावातील ओढ्यालगतच्या गायरण जमिनीवरही अवैध उत्खनन सुरू आहे. दिवस-रात्र सुरू असलेल्या ब्लास्टिंगमुळे संपूर्ण परिसर हादरत असून अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत. (पान ३वर)



# राज्यात पोषण आहारात घोटाळा

मुंबई (वृत्तसंस्था)

धाराशिव जिल्ह्यातील १५४५ शाळांमधील पहिली ते आठवीच्या १ लाख ६० हजार ७२० विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराच्या साहित्य खरेदीत भ्रष्टाचार झाला आहे. ३० रुपये किलो मिळणारा पांढरा वाटाणा १३४ रुपये दराने खरेदी केला. याप्रमाणे इतरही मालाचे दर वाढवून ६.२२ कोटींचा घोटाळा झाल्याचे माहिती अधिकारात समोर आले आहे. राज्यात पोषण आहारात सुमारे ४०० कोटींचा घोटाळा झाल्याचा संशय आहे. सरकारने चौकशीचे आदेश दिले आहेत.

२०२५-२६ मध्ये शासनाने मंजूर केलेले खरेदी दर आणि प्रत्यक्ष खरेदीच्या दरांमध्ये मोठी तफावत आहे. निविदेत हिरव्या वाटाण्याचा उल्लेख केला, प्रत्यक्षात कार्यारंभ आदेश देताना प्रशासनाने केवळ वाटाणा असा उल्लेख ठेवला. त्यामुळे ३० रुपये किलो दराने मिळणारा पांढऱ्या वाटाणा १३४ रुपये दरात खरेदीचा मार्ग मोकळा झाला. शालेय पोषण आहारातील धान्यादी मालाचा पुरवठा करण्याची ई- निविदा पुणे येथील प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून राबवण्यात आली. तेथूनच कंत्राटदार निश्चित करण्यात आले. बाजारभाव आणि गुणवत्ता तपासण्याची यंत्रणा नसल्याचा फायदा घेत कंत्राटदारांनी अव्वाच्या सव्वा दर लावून माल शाळांपर्यंत पोहोचवला. । राज्यातील शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या 'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत' एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शालेय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनात नियमानुसार 'हिरवा वाटाणा' देण्याऐवजी 'साधा वाटाणा' पुरवून विद्यार्थ्यांच्या पोषणाशी खेळ केला जात असल्याची बाब उघडकीस आली आहे.

# ड्रग्ज विरोधात मोठी कारवाई

## गुजरातमध्ये आंतरराष्ट्रीय जहाजातून ११५० कोटींचे कोकेन जप्त

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

गुजरातमध्ये ड्रग्जविरोधी कारवाईत मोठे यश आले आहे. भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात दहशतवादविरोधी पथकाने मुंद्रा किनाऱ्याजवळ संयुक्त कारवाई केली. यामध्ये एका कंटेनर जहाजातून अंदाजे १,१५० कोटी रुपये किमतीचे ११५ किलो कोकेन जप्त केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ही कारवाई २५ आणि २६ मे च्या मध्यरात्री करण्यात आली. सागरी मार्गाने होणाऱ्या अमली पदार्थांच्या तस्करीबाबत गुजरात दहशतवादविरोधी पथकाने दिलेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.विरोधकांना मोठा झटका! मतदार यादीची 'डखठ' मोहीम वैध; 'वोटर लिस्टधून नाव कट झाले तरी...' सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा निकालजहाज ताब्यात घेतलेभारतीय तटरक्षक दलाच्या इंटरसेप्टर बोटींनी मुंद्रा नांगरक्षेत्रात एक मोठी शोधमोहीम सुरू केली. बोटीवर एटीएस अधिकारीही उपस्थित होते. मुंद्रापासून सुमारे पाच सागरी मैल अंतरावर, या परिसरात नांगरून ठेवलेल्या एका कंटेनर जहाजावर संशयास्पद हालचाल आढळून आली.

या जहाजाची ओळख 'एमव्ही युरोप' अशी पटली आहे.संयुक्त पथकाच्या लक्षात आले की अंधारात जहाजातून काही पिशव्या समुद्रात फेकल्या जात आहेत, त्यानंतर आयसीजी आणि एटीएसचे जवान तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि कमी दृश्यमानता असूनही समुद्रातून पाच पिशव्या बाहेर काढल्या.११५ किलो वजनाचे आणि १,१५० कोटी किमतीचे कोकेनतपासणी केल्यावर, पिशव्यांमध्ये प्रत्येकी अंदाजे एक किलो वजनाची, पांढऱ्या पावडरसारख्या पदार्थाची ११५ पाकिटे आढळली.

प्राथमिक तपासात हा पदार्थ कोकेन असल्याची पुष्टी झाली आहे. जप्त केलेल्या एकूण अवैध मालाचे वजन अंदाजे ११५ किलो असून, खुल्या स्रोतांमधून मिळालेल्या अंदाजानुसार, आंतरराष्ट्रीय बाजारात त्याचे अंदाजित मूल्य अंदाजे १,१५० कोटी आहे.

# भोंदू खरातचे काळे कारनामे आता सिनेमातून उलगडणार

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण नाशिकमध्ये समोर आले आणि संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. खरात प्रकरणाने सामाजिक काय तर राजकीय वर्तुळातही मोठ्या हालचाली घडल्या. अशोक खरातची सध्या पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. अशातच आता महत्त्वाची बातमी समोर आली आहे. अख्खा महाराष्ट्र हादरवणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरातच्या काळ्या कृत्यांवर लवकरच सिनेमा येणार आहेत.

नुकतीच घोषणा झालेल्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या मराठी चित्रपटातुन संपूर्ण महाराष्ट्र हादरवणाऱ्या खरात प्रकरणाचा पर्दाफाश करण्यात येणार आहे. मोशन पोस्टर प्रदर्शित करून 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. २ ऑक्टोबर २०२६ रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असल्याचे मोशन पोस्टरवर घोषित करण्यात आले आहे.

सोशल मीडियावर मोशन पोस्टर प्रदर्शित करून आगामी 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या मराठी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. जैन फिल्म प्रोडक्शन आणि मातोश्री एन्टरटेन्मेंट वर्ल्ड प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी देवेंद्र भट, सुर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे यांनी स्वीकारली आहे. वास्तवदर्शी कथानकावर आधारलेल्या या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शक स्वरूप बी. सावंत यांनी एक आव्हानात्पक पाऊल टाकले आहे.'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' चित्रपटाची कथा सध्या तरी गुलदस्त्यात असून, कलाकारांची नावेही गुप्त ठेवण्यात आली आहेत. लवकरच या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात करण्यात येणार आहे. या चित्रपटाची कथा सागरकुमार एस. जैन यांनी लिहीली असून, पटकथा व संवादलेखन संजय नवगिरे यांनी केले आहे. डिओपी आकाश काकडे या चित्रपटाची सिनेमॅटोग्राफी करणार असून, कला दिग्दर्शन अक्षय आंबेकर करणार आहेत. वेशभूषा आकांक्षा गांधी यांची असून, सचिन घणवंत या चित्रपटाचे प्रोडक्शन हेड आहेत तसेच नेहा घोडके प्रॉडकशन कंट्रोलर म्हणून काम पाहणार आहेत.

# हर्षवर्धन सपकाळांना राज्यात फिरू देणार नाही - चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई (वृत्तसंस्था)

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात अत्यंत अश्लाघ्य शब्दांत टीका केली आहे. त्यातून त्यांची नीच प्रवृत्ती दिसून येते. त्यांनी आपली भाषा सुधारली नाही, तर भाजप कार्यकर्ते त्यांना महाराष्ट्रात कुठेही फिरू देणार नाहीत, असा इशारा भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. यावेळी त्यांनी महायुतीच्या विधानपरिषद निवडणुकीच्या जागावाटपाची घोषणा उद्या किंवा परवा होईल असेही सांगितले.

विरोधी पक्षांनी मंगळवारी चांदवड येथे शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित केला होता. यावेळी भाषण करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत तिखट शब्दांत आगपाखड केली होती. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात बोलताना त्यांच्या या टीकेचा समाचार घेतला. ते म्हणाले, ते म्हणाले, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी केलेली टिप्पणी अत्यंत अश्लिल आहे. त्यातून हर्षवर्धन सपकाळ यांची नीच प्रवृत्ती दिसून येते. त्यांची बुद्धी बुद्धीहिन झाली आहे.

विरोधी बाकावर असल्यामुळे सपकाळांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे अशी विधाने करून ते गावागावात व समाजात तेढ निर्माण करणे, वाद निर्माण करणे व समाजातील चांगले वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी असे विधान करून खूप मोठी चूक केली आहे. भाजपचा कार्यकर्ता हर्षवर्धन सपकाळ यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही. ते सुधारले नाही तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करणे सोडले पाहिजे. त्यांनी चांगल्या भाषेत बोलले पाहिजे. त्यांची नीच व नालायक टीकेला आम्ही सोडणार नाही.चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमधील वादग्रस्त घटनाक्रमावरही भाष्य केले. ते म्हणाले, राष्ट्रवादीच्या बैठकीत सुनील तटकरे व छगन भुजबळ यांच्यात वाद झाला असेल असे मला वाटत नाही.

# गुन्ह्यात मदतीसाठी लाखाची लाच; पोलीस उपनिरीक्षकाविरुद्ध गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यामध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी एक लाख रूपयांची लाच मागितल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक जयेश मोतीलाल गांगुर्डे याच्याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तोफखाना पोलीस ठाण्यात बुधवारी (२७ मे) गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नाशिक येथून गांगुर्डे याला ताब्यात घेतले असल्याचे उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी सांगितले. यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजू आल्हाट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. उपनिरीक्षक गांगुर्डे हा तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असून, त्याने एका गुन्ह्यात मदत करण्यासाठी सुरूवातीला दोन लाख रूपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. त्यानंतर तडजोडीनंतर एक लाख रूपयांवर व्यवहार निश्चित करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारदार यांनी १८ मे २०२६ रोजी तक्रार नोंदवली होती. तक्रारदाराच्या मामासह १५ जणांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक गांगुर्डे याच्याकडे होता. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि आरोपींना सहकार्य करण्याच्या मोबदल्यात गांगुर्डे याने दोन लाख रूपयांची मागणी केली होती. तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. यानंतर पंचांसमक्ष येथील पोलीस मुख्यालयाच्या गेटवर पडताळणी कारवाई केली असता संबंधित गुन्ह्यात मदत करण्यासाठी गांगुर्डे याने तक्रारदाराकडे एक लाख रूपयांची लाच मागण्यात आल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी बुधवारी गुन्हा नोंद करून गांगुर्डे याला ताब्यात घेतले आहे.

गेल्या आठ दिवसांपूर्वीच उपनिरीक्षक गांगुर्डे याची सहायक निरीक्षकपदी पदोन्नती झाली होती. त्याची बदली नाशिक येथे झाली आहे. दरम्यान, पदोन्नतीनंतर त्याला कार्यमुक्त करण्यात आले नव्हते. येथील पोलीस मुख्यालयात सुरू असलेल्या प्रशिक्षणासाठी त्याला पाठविण्यात आले होते. तेथे त्याने तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी केली. दरम्यान, त्याला मंगळवारी (२६ मे) तालुका पोलीस ठाण्यातून कार्यमुक्त करण्यात आले आणि बुधवारी (२७ मे) त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कुपोषणग्रस्तांसाठी उपाययोजना करा

## ग्राहक पंचायतची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले आदिवासी तालुक्यात तीव्र व मध्यम कुपोषित (सॅम व मॅम) बालकांची संख्या वाढत आहे. दुर्धर आजारांनी ग्रस्त बालकांचाही प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे कुपोषण निर्मूलनासाठी युद्धपातळीवर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भातील निवेदन निवासी नायब तहसीलदार किसन लोहारे व पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिवराम डगळे यांना देण्यात आले. या निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे, भाऊसाहेब आभाळे, मच्छिंद्र मंडलिक, महेश नवले, दत्ता शेणकर, राम रुद्रे, प्रा. डॉ. सुनील शिंदे, भाऊसाहेब वाकचौरे, ॲड. दीपक शेटे, ॲड. राम भांगरे, सीताराम भांगरे पाटील, रामहरी तिकांडे, प्रमोद मंडलिक, भाऊसाहेब वाळुंज, रामदास पवार, अशोक उघडे, राजेंद्र गवांदे, मोहन मुंडे, अनंत घाणे, हरिभाऊ अस्वले, सुनील देशमुख, पांडुरंग पथवे आदींच्या सह्या आहेत.

या निवेदनात म्हटले आहे, की एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत अकोले व राजूर प्रकल्पांमार्फत कुपोषित बालकांचे सातत्याने सर्वेक्षण केले जाते, तसेच तालुका आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालय अकोले अंतर्गत कार्यरत आरबीएसके पथकाच्या माध्यमातून अंगणवाड्यांमध्ये बालकांची आरोग्य तपासणी केली जाते. वाड्या-वस्त्यांमध्ये कमी वजन व कमी उंची असलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना पोषक आहार व आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले जातात.

कमी वजनाच्या बालकांना नाचणीपासून बनविलेले पदार्थ, गूळ, शेंगदाणे, लाडू, गावरान तूप, अमृत आहारातील अंडी व केळी तसेच पोषण कल्पवडी, जीवनसत्त्वयुक्त क्षार व सूक्ष्म पोषकतत्त्वांचा समावेश असलेली आहार किट दिली जात असल्याचे निवेदनात नमूद आहे. याशिवाय पोषण अभियानांतर्गत पालक सभा, महिला मेळावे, माता बैठका, पोषण रॅली, तसेच पोषण माह व पोषण पंधरवडा उपक्रमही राबविले जात आहेत. असे असतानाही आदिवासी प्रमाण भागातील कुपोषणाचे अपेक्षितरित्या कमी होत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. केंद्र व राज्य सरकारकडून कोट्यवधी रुपये खर्च करून विविध योजना राबविल्या जात असल्या, तरी कुपोषणाची आकडेवारी चिंताजनक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# आ. डॉ. लहामटे यांची अकोल्यातील विविध प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांशी चर्चा

युवावार्ता (प्रतिनिधी) अकोले -

अकोले विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात आमदार डॉ. किरण लहामटे यांनी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत मतदारसंघातील अनेक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले.

या बैठकीत प्रामुख्याने अकोले मतदारसंघातील वाढत्या अवैध दारू विक्रीवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. तसेच, दोनपेक्षा जास्त गुन्हे दाखल असणाऱ्या सराईत गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. प्रधानमंत्री यासोबतच जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेत रुग्णांना येणाऱ्या अडचणी, राजूर उपजिल्हा रुग्णालयास विशेष बाब म्हणून मंजुरी देणे, अकोले पोलीस ठाणे व पोलीस अधिकारी वसाहतीस मंजुरी मिळवणे आणि कोल्हार-घोटी रस्त्याच्या अपूर्ण कामांसंदर्भातही मुख्यमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली असल्याचे आमदार डॉ. लहामटे यांनी स्पष्ट केले.

# मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत शनिवारी तळेगाव दिघेत ऊस विकास मेळावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संपूर्ण देशातील सहकारासाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने शनिवार दिनांक ३० मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वा. महाराजा लॉन्स येथे काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीमध्ये ऊस विकास मेळावा आयोजित करण्यात आले असल्याची माहिती व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली आहे.

• थोरात कारखाना कार्यक्षेत्रात ऊस लागवडीत वाढ व्हावी याकरता बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली जोर्वे, खांडगाव व साकुर येथे ऊस विकास मेळावा संपन्न झाला. तळेगाव व निमोण परिसरातील शेतकऱ्यांसाठी ऊस विकास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी व कारखान्याचे सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत. यावेळी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग व डॉ. समाधान सुरवसे हे मार्गदर्शन करणार आहेत. तरी या ऊस विकास मेळावा कार्यक्रमासाठी तळेगाव व निमोण परिसरातील सर्व शेतकरी सभासद ऊस उत्पादक युवक महिला कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सर्व संचालक मंडळ व कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## वर्षभरात रोखले ५५ बालविवाह

जिल्हा माहिती कार्यालय-

अहिल्यानगर - जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करत महिला व बाल विकास विभागाकडून 'बालविवाह मुक्त भारत' अभियान राबविण्यात येत आहे. वर्षभरात ५५ बालविवाह रोखण्यात यश आले, तर बालविवाह प्रकरणांमध्ये १५ - कुटुंबांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बालविवाह जिल्हा महिला व बालविकास (पान ३ वर)

# एसएमबीटी'मध्ये अत्याधुनिक लेझर तंत्रज्ञानाने मूत्रविकार शस्त्रक्रिया

# उत्तर महाराष्ट्रातील सर्वात अद्ययावत लेझर मशीन दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक -वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टरांचे कौशल्य यांच्या बळावर नाशिकच्या एसएमबीटी हॉस्पिटलने उत्तर महाराष्ट्रात सुपर स्पेशालिटी उपचारांचे एक नवे पर्व सुरू केले आहे. हॉस्पिटलचा मूत्ररोग विभाग हलाखीच्या अवस्थेत आलेल्या रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. याठिकाणी अतिशय क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या जात असून या सर्व शस्त्रक्रिया या शासकीय योजनेअंतर्गत मोफत होत असल्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना जागतिक दर्जाचे उपचार तेही मोफत आणि परवडतील अशा दरात करून घेणे शक्य झाले असल्याची माहिती मूत्ररोग विभाग प्रमुख आणि प्रसिद्ध मूत्रविकार तज्ञ डॉ. नरसिंग माने यांनी दिली.

ते म्हणाले, मूत्ररोग विभागात नुकतेच अत्यंत प्रगत आणि अत्याधुनिक लेझर मशीन दाखल झाले आहे. ६०थ थुलियम लेझर जे उत्तर महाराष्ट्रात 'लेझर प्रोस्टेट' शस्त्रक्रिया करण्यासाठी सक्षम आहे. यासोबतच १०० टक्के मुतखड्याचे ऑपरेशन करण्यासाठीदेखील हे लेझर महत्वाचे आहे. यामुळे शरीरावर कोणताही काप किंवा चिरा देण्याची गरज नाही. संपूर्णपणे दुर्बिणीद्वारे आणि लेझरच्या साहाय्याने खड्यांचे बारीक कण करून ते शरीराबाहेर काढणे शक्य झाले आहे. यामुळे रुग्णाला कोणतीही अंतर्गत किंवा बाह्य दुखापत होत नाही, रक्तस्राव होत नाही. शिवाय वेदनाही जाणवत नाहीत. या तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे रुग्ण अवघ्या दुसऱ्या दिवशी बरा होऊन रुग्णालयातून डिस्चार्ज मिळवू शकतो. या लेझर तंत्रज्ञानाचा लाभ नाशिकसह संपूर्ण उत्तर महाराष्ट्र, ठाणे, पालघर, छ. संभाजीनगर, जालना, बुलढाणा, बीड, धाराशिव परिसरातील रुग्णांची मोठी गैरसोय टळली आहे.

डॉ. माने पुढे म्हणाले की, किडनी, मूत्रवाहिनी आणि मूत्रशयातील मुतखडा प्रोस्टेट ग्रंथी वाढणे, दोन्ही किडन्या निकामी होणे किडनी प्रत्यारोपण डायलिसीस, कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी प्रशस्त स्वतंत्र वार्ड, किडनी, प्रोस्टेट व मूत्रशयाचा कॅन्सर , मूत्रमार्गाचा जंतूसंसर्ग लघवीतून रक्त येणे, महिलांमध्ये खोकताना किंवा शिंकताना नकळत लघवी गळणे पुरुषांमधील वंध्यत्व आणि लैंगिक समस्या लहान मुलांमधील जन्मजात मूत्रविकार किडनीला सूज येणे आणि मूत्रमार्गाची अरुंदता, किडनी निकामी झालेल्या रुग्णांना नवजीवन देण्यासाठी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये राबवला जाणारा 'किडनी ट्रान्सप्लांट' (मूत्रपिंड प्रत्यारोपण) उपक्रम अत्यंत यशस्वी ठरत असल्याचे सांगत डॉ. माने यांच्यासह टीमने वर्षभरात १७ हून अधिक किडनी ट्रान्सप्लांट यशस्वी केले आहेत. किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रियांचा 'सक्सेस रेट' अतिशय उत्तम आहे. चोख पूर्वतयारी, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर आणि शस्त्रक्रियेनंतरची विशेष देखभाल यामुळे अनेक रुग्णांना याठिकाणी पुनर्जन्म मिळाला आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरक्षित, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



# माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश निश्चित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अहिल्यानगर मतदारसंघातील उमेदवारीसाठी भाजपकडून माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून तनपुरे यांचा ३० मे रोजी भाजप प्रवेश होणार आहे. भाजप पक्ष पदाधिकारी तसेच तनपुरे समर्थकांकडून याला दुजोरा मिळाला आहे. प्राजक्त तनपुरे हे शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांचे भाचे आहेत.

प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे माजी आमदार आहेत. त्यांच्या भाजप प्रवेशाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा होत आहे. परंतु आता ते भाजपकडून विधानपरिषदेची निवडणूक लढवणार असल्याचे तसेच त्यांचा भाजप प्रवेशाचा मुहूर्त ३० मे रोजी ठरल्याची माहिती मिळाली. यासंदर्भात प्राजक्त तनपुरे यांच्याशी वारंवार संपर्क केला असता त्यांचा दूरध्वनी बंद असल्याचे आढळले. प्राजक्ता तनपुरे हे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील मातब्बर नेते माजी खासदार प्राजक्त तनपुरे यांचे चिरंजीव आहेत. त्यांच्या आई डॉ. उषा तनपुरे राहुरी पालिकेच्या नगराध्यक्ष होत्या.

नुकतीच विधानसभेच्या राहुरी मतदारसंघासाठी पोटनिवडणूक झाली. या पोटनिवडणुकी पूर्वीपासून प्राजक्त तनपुरे वेगळी भूमिका स्वीकारणार असल्याचे संकेत मिळत होते. त्यांनी भगवी टोपी, भगवे उपरणं असा वेष परिधान करत हे संकेत दिले होते. त्यानंतर पोटनिवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी झालेल्या संपर्कातून तनपुरे यांनी पोटनिवडणुकीत उमेदवारी न करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांच्या या निर्णयामुळे भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांचा विजय सहजसाध्य झाला.मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांच्या संपर्कातून तनपुरे यांना विधान परिषदेच्या उमेदवारीचा शब्द मिळाल्याची चर्चा होत होती. त्याचा प्रत्यय आता येऊ लागला आहे. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे भाचे आहेत. जयंत पाटील यांच्याच भाजप प्रवेशाची चर्चा होत आहे. तनपुरे यांनी दोन दिवसांपासून त्यांच्या 'डीपी'वर जयंत पाटील यांना भावनिक साद घालणारे छायाचित्र प्रदर्शित केले होते. त्यातूनही त्यांच्या पक्षप्रवेशाचे संकेत मिळत होते.

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अहिल्यानगर मतदारसंघाची जागापूर्वी एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसकडे होती. त्याआधारे अजित पवार गटाने महायुतीच्या जागा वाटपात अहिल्यानगरच्या या जागेवर दावा केला.

# राजूर बसस्थानकात अशुद्ध पाणी पुरवठा

युवावार्ता (प्रतिनिधी) राजूर -

राजूर बसस्थानकात येणाऱ्या प्रवाशांना साधे पिण्याचे स्वच्छ पाणीही उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा साचलेला असून, स्वच्छतेचा पूर्ण अभाव दिसून येत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेकदा लेखी तक्रारी करूनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत तक्रारी पोहोचूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. परिणामी एसटी प्रशासनाच्या कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे. उन्हाळा संपून पावसाळ्याची चाहूल लागली असताना प्रवाशांना पिण्याचे स्वच्छ पाणीही मिळालेले नाही. दुसरीकडे परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून, दुर्गंधीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. दूषित वातावरणामुळे डेंग्यू, गॅस्ट्रो, कावीळ यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अधिकारी आणि कर्मचारी तक्रारींची दखल घेण्याऐवजी अरेरावीची भाषा वापरत असल्याचा आरोप प्रवाशांतून करण्यात येत आहे. एसटीला मूलभूत सुविधा देण्यात अपयश येत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## वर्षभरात...

पान २ वरून -

विभागामार्फत रोखण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. बालविवाह विरोधी जनजागृतीसाठी पथनाट्य, पत्रके, पोस्टर्स आदी विविध माध्यमांचा उपयोग करण्यात येत आहे. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. 'बालविवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांच्या नोंदी, जनजागृती उपक्रम, तसेच बालविवाह विरोधी शपथ आदी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

# युवा व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन : दत्ता ढगे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : राष्ट्र सेवा दल संगमनेरच्या वतीने १६ ते २५ वयोगटातील युवक-युवतींसाठी युवा व्यक्तिमत्व विकास उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्र सेवा दलाचे राज्य कार्यकारिणी सदस्य दत्ता ढगे यांनी दिली.

हे शिबिर दि. २९ मे ते १ जून २०२६ या कालावधीत खांडेश्वर सांस्कृतिक भवन, खांडगाव (ता. संगमनेर) येथे आयोजित करण्यात आले आहे. युवकांमध्ये उपजत असलेले नेतृत्वगुण, कला-क्रीडा कौशल्य तसेच संवादकौशल्य विकसित करून त्यांच्यात सामाजिक जाणीवा निर्माण करणे हा या शिबिरामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

युवा वयोगट हा नवनिर्मितीसाठी अत्यंत वैचारिक आणि क्रियाशील मानला जातो. मात्र, या वयात योग्य दिशा मिळणे आवश्यक असते. सध्याच्या काळात मोबाईलसारख्या साधनांच्या अतिवापरामुळे युवकांचा कौटुंबिक सहवास आणि सामाजिक सहभाग कमी होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या वैचारिक गोंधळातून काही युवक चुकीच्या मार्गाकडे वळत असल्याची चिंताही व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर युवक वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिकदृष्ट्या सजग व्हावेत, त्यांच्यामध्ये सर्वांगीण प्रगल्भता निर्माण व्हावी तसेच जबाबदार नागरिक म्हणून त्यांचे भवितव्य घडावे, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना या उन्हाळी युवा व्यक्तिमत्व विकास शिबिरात सहभागी करून घ्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

शिबिरात प्रवेश घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी राष्ट्र सेवा दल राज्य मंडळ सदस्य रजत अवसक (मो. ९४०५२७२२२३) तसेच संजयकुमार शिंदे (मो. ९८५०१७९२०५) यांच्याशी संपर्क साधावा.

# अहिल्यानगर जिल्ह्यात टँकरचे शतक पार

## दोन लाख नागरिकांवर पाणीटंचाईचे संकट

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे आणि आटत चाललेल्या जलस्रोतांमुळे पाणीटंचाईने गंभीर रूप धारण केले आहे. तापमानाचा पारा तब्बल ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिक हैराण झाले असून जिल्ह्यात टँकरची संख्या आता शतकाच्या पुढे गेली आहे. सध्या तब्बल १ लाख ९९ हजार ४३५ लोकसंख्येसाठी १०७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या नजरा आता मान्सूनकडे लागल्या आहेत.

एप्रिल महिन्याच्या अखेरीस जिल्ह्यातील संगमनेर, नगर, पारनेर आणि पाथर्डी या चार तालुक्यांतील २६ गावे आणि १२० वाड्यांना ३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. त्या वेळी सुमारे ४५ हजार नागरिकांना या टँकरचा आधार होता. मात्र मे महिन्यात टंचाईची तीव्रता झपाट्याने वाढली असून आता १११ गावे आणि ६५० वाड्यावस्त्यांपर्यंत टँकर पोहोचले आहेत.

जिल्ह्यात सर्वाधिक भीषण परिस्थिती पारनेर तालुक्यात निर्माण झाली आहे. येथे ३५ गावे आणि २८६ वाड्यांना ३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर संगमनेर तालुक्यात २० टँकरद्वारे २६ गावे आणि ५८ वाड्यांना, अकोले तालुक्यात ३ टँकरद्वारे ५ गावे आणि २१ वाड्यांना, अहिल्यानगर तालुक्यात १३ टँकरद्वारे १५ गावे आणि ६३ वाड्यांना पाणीपुरवठा सुरू आहे.

याशिवाय नेवासे तालुक्यात १ गाव आणि १७ वाड्यांसाठी १ टँकर, पाथर्डीत १४ टँकरद्वारे ९ गावे आणि ५७ वाड्या, तर कर्जत तालुक्यात ११ टँकरद्वारे १० गावे आणि १०१ वाड्यांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पारनेर नगरपंचायत क्षेत्रातील ३१ वाड्यांसाठीही ४ टँकर कार्यरत आहेत.

पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने ८ गावांच्या पाणीपुरवठ्यासाठी खासगी विहिरी आणि कूपनलिका अधिग्रहित केल्या आहेत. मात्र तरीही अनेक भागांत पाण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

दरम्यान, केंद्र शासनाने लोकसभा निवडणुकीपूर्वी मोठ्या गाजावाजात जाहीर केलेल्या जलजीवन योजनेची अनेक कामे अजूनही अपूर्ण असल्याचा आरोप होत आहे. प्रारंभी निधी उपलब्ध करून देण्यात आला; मात्र निवडणुकांनंतर निधी कपात झाल्याने अनेक गावांतील योजना रखडल्या. परिणामी पाणीटंचाई अधिकच गंभीर बनल्याचे चित्र आहे.

## ब्लास्टिंगच्या दहशतीने ...

पान १ वरून -

धुळीचे प्रदूषण, प्रचंड आवाज आणि सततचे स्फोट यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिक मानसिक तणावाखाली जीवन जगत असल्याची व्यथा ग्रामस्थांनी मांडली.

खाणकाम, ब्लास्टिंग आणि स्टोन क्रेशरमुळे परिसरातील अनेक विहिरी, बोअरवेल आणि नैसर्गिक पाणी स्रोत बंद पडल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तीव्र बनला असून शेतीचेही मोठे नुकसान होत आहे. कष्टाने उभा केलेला संसार उद्ध्वस्त होत आहे, अशी हळहळ बाधित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर पुढील मागण्या ठामपणे मांडल्या आहेत -

सुरत-हैदराबाद महामार्गाच्या मार्गात सुरू असलेले खाणकाम तात्काळ बंद करावे. गावातील ओढ्यालगत गायरण जमिनीवर सुरू असलेल्या अवैध उत्खननाची चौकशी करून कारवाई करावी. खाणकाम, ब्लास्टिंग आणि स्टोन क्रेशरमुळे बंद पडलेले पाणी स्रोत पूर्ववत सुरू करावेत. जनावरे, कुटुंबे, शेती आणि ग्रामस्थांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन आर्थिक भरपाई द्यावी. वडझरी परिसरातील बेकायदेशीर खाण आणि स्टोन क्रेशर तात्काळ बंद करावेत. घरांचे, विहिरींचे, बोअरवेलचे आणि गोठ्यांचे पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी. पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून परवाने रद्द करावेत. धुळ, आवाज आणि प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची वैद्यकीय तपासणी करावी.

ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासनावर दबाव टाकणाऱ्या खाणमाफियांवर कठोर कारवाई करावी. संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. दरम्यान, परिसरातील काही आजी-माजी लोकप्रतिनिधींच्या आशीर्वादामुळेच खाण व क्रेशर व्यवसाय बिनधास्त सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. विकासाच्या नावाखाली तालुका भकास होत आहे; मग लोकप्रतिनिधी गप्प का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उघडपणे उपस्थित करत आहेत. यापूर्वीही ग्रामस्थांनी प्रशासनाला अनेक वेळा निवेदने देऊन कारवाईची मागणी केली होती. मात्र ठोस उपाययोजना न झाल्याने आता ग्रामस्थांनी आमरण उपोषण, रास्ता रोको आणि तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करून खाणमाफियांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# ८७० ग्रामपंचायतींच्या लवकरच निवडणूका

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - आरक्षणाअभावी रखडलेल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाने मुदत संपलेल्या आणि निवडणुकीस पात्र असलेल्या राज्यातील १४ हजार ३१४ ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यात जिल्ह्यातील ८७० ग्रामपंचायतींचा समावेश आहे. आरक्षणाची सोडत विशेष ग्रामसभेत काढली जाणार आहे. त्यानंतर या ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकणी यांनी जारी केलेल्या आदेशानुसार राज्यातील ३६ जिल्ह्यांतील १४ हजार ३९४ पंचवार्षिक मुदतीचा कार्यकाळ संपलेल्या, तसेच नव्याने स्थापन झालेल्या आणि निवडणुकीस पात्र असलेल्या ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यापूर्वीच्या २०२४-२५ या वर्षात पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतीच्या प्रभागाची आरक्षण सोडत काढण्यात आली होती. दरम्यानच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने आयोगाची अधिसूचना रद्द केली. त्यामुळे त्या दोन्ही वर्षातील, तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतीच्या प्रभागाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आता नव्याने जाहीर करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत प्रभाग आरक्षण सोडतीचा हा कार्यक्रम राष्ट्रभरात एकाच कार्यक्रमानुसार राहणार आहे. आरक्षणासाठी विशेष ग्रामसभेची सूचने ८ जूनला तहसीलदारांमार्फत प्रसिद्ध

केली जाणार आहे. संबंधित तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यान्या अध्यक्षतेखाली १२ जूनला विशेष ग्रामसभेत आरक्षणाची सोडत काढली जाणार आहे. या सोडतीमध्ये अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला आणि सर्वसाधारण महिला या प्रवर्गाचे आरक्षण निश्चित केले जाणार आहे. या प्रभागनिहाय आरक्षण प्रारूप अधिसूचनेला जिल्हाधिकारी १७ जूनपर्यंत मान्यता देणार आहेत. जिल्हाधिक्रनप्यांच्या मान्यतेनंतर प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारूप १९ जूनला प्रसिद्ध केले जाणार आहे. या प्रारूप आरक्षणावर २५ जूनपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार आहेत. या हरकतींवर ३ जुलैला प्रांताधिकारी अभिप्राय देणार आहेत. प्रांताधिकारी यांचा अभिप्राय विचारात घेऊन ८ जुलैपर्यंत जिल्हाधिकारी त्यास अंतिम मान्यता देणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यता दिलेल्या अंतिम प्रभाग रचनेची प्रसिद्धी १० जुलैला देण्यात येणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील २०२४ आणि २०२५ या कालावधीमध्ये शंभर ग्रामपंचायतींच्या कार्यकाळ पूर्ण झालेला आहे. लोकसभा, विधान सभा, विधान परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था या निवडणुकांमुळे २०२४ मध्ये कार्यकाळ पूर्ण झालेल्या ८५ ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या नाहीत. २०२५ या वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे अनेक गावे बाधित झाली. या वर्षातील १५ ग्रामपंचायतीच्या निवडणुका रखडल्या आहेत. दोन्ही वर्षातील शंभर ग्रामपंचायतींच्या निवडणुका स्खडल्या आहेत. या ठिकाणी प्रशासक म्हणून ग्राम विस्तार अधिकारी, पशुसंवर्धन विस्तार अधिकारी आदींवर प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**तालुक्यातील ग्रामपंचायतींची रणधुमाळी -**

**अकोले ५२, संगमनेर ९४, कोपरगाव २९, राहाता २५, श्रीरामपूर २७, राहुरी ४४, नेवासे ५९, पाथर्डी ७९, शेवगाव ४८,**

# कर्नाटकमध्ये खांदेपालट, डी. के. शिवकुमार नवे मुख्यमंत्री

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी गुरुवारी राजीनाम्याची घोषणा केली. त्यांनी बंगळुरू येथील त्यांच्या निवासस्थानी मंत्र्यांसोबत नाश्त्याची बैठक बोलावली होती. या बैठकीत त्यांनी सर्व मंत्र्यांना त्यांच्या निर्णयाबद्दल माहिती दिली. उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमारही बैठकीला उपस्थित होते. शिवकुमार यांनी सिद्धरामय्यांच्या पायांना स्पर्श केला, त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यांना मिठी मारली. काँग्रेस आमदार अशोक पत्तन यांच्या मते, डी. के. शिवकुमार मुख्यमंत्री होऊ शकतात.

सिद्धरामय्या यांनी राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या भेटीसाठी वेळ मागितला होता. मात्र, राज्यपाल कौटुंबिक कारणांमुळे बंगळुरूबाहेर आहेत. अशा परिस्थितीत सिद्धरामय्या राज्यपालांच्या कार्यालयात आपला राजीनामा सादर करू शकतात. त्यांनी राजीनामा देण्यासाठी दुपारी ३ वाजेपर्यंतचा वेळ मागितला होता. नियमानुसार, राज्यपाल राज्यात उपस्थित नसले तरीही मुख्यमंत्री आपला लेखी राजीनामा राजभवनातील अधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे किंवा स्वतः जाऊन देऊ शकतात. राज्यपाल नंतर तो स्वीकारतात. राजीनामा मंजूर होईपर्यंत सध्याचे मुख्यमंत्रीच पदावर राहतील. डीके शिवकुमार यांची शुक्रवारी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाईल. काँग्रेस डीके यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापनेचा दावा करेल. बिहारमध्ये एनडीएने ज्याप्रकारे माजी मुख्यमंत्री नितीश यांच्या मुलाला नवीन सरकारमध्ये मंत्री बनवले, त्याचप्रकारे सिद्धरामय्या यांच्या मुलाला मंत्री बनवले जाऊ शकते.

## संपादकीय...

### कर्जमंजुरीत कृत्रिम बुद्धिमत्तेची वाढती भूमिका

आजच्या वेगवान डिजिटल युगात आर्थिक व्यवहारांची पद्धत झपाट्याने बदलत आहे. एकेकाळी बँकेत जाऊन कर्जासाठी अर्ज करणे, अनेक दिवस कागदपत्रांची तपासणी होणे, हमीदार शोधणे, वारंवार बँकेच्या फेऱ्या मारणे आणि अखेरीस कर्ज मंजूर होईल की नाही याबाबतची अनिश्चितता सहन करावी लागायची. मात्र आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे कर्जप्रक्रियेत मोठी क्रांती घडताना दिसत आहे. माणसाने तयार केलेली ही तंत्रज्ञानाधारित बुद्धिमत्ता केवळ उद्योग, शिक्षण किंवा आरोग्य क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती बँकिंग आणि वित्तीय व्यवस्थेच्या केंद्रस्थानी पोहोचली आहे. त्यामुळे भविष्यात कर्ज मिळवण्याची प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, लघुउद्योजक, शेतकरी, महिला बचतगट आणि नवउद्योजक यांच्यासाठी ही व्यवस्था मोठी आशेची किरण ठरू शकते. भारतातील मोठा वर्ग आजही औपचारिक बँकिंग व्यवस्थेपासून काही प्रमाणात दूर आहे. अनेकांना उत्पन्नाचे ठोस पुरावे नसतात, नियमित आर्थिक व्यवहारांची नोंद नसते किंवा पारंपरिक पतमापन निकषांमध्ये ते बसत नाहीत. त्यामुळे गरज असूनही कर्ज नाकारले जाते. अशा वेळी कृत्रिम बुद्धिमत्ता विविध डिजिटल व्यवहार, मोबाईल वापर, ऑनलाईन खरेदी, वीजबिल भरणा, शेतीसंबंधित व्यवहार किंवा इतर आर्थिक हालचालींचे विश्लेषण करून व्यक्तीची आर्थिक क्षमता ओळखण्याचा प्रयत्न करते. यामुळे केवळ कागदपत्रांवर अवलंबून राहण्याऐवजी व्यक्तीच्या प्रत्यक्ष आर्थिक वर्तनावर आधारित निर्णय घेता येऊ लागतात. परिणामी, पूर्वी बँकांच्या दारात नाकारले गेलेले अनेक लोक आता वित्तीय व्यवस्थेत सामील होऊ शकतात. कर्ज प्रक्रियेत होणारा वेळेचा विलंब ही अनेकांची मोठी समस्या असते. विशेषतः शेतकरी, छोटे व्यापारी किंवा आपत्कालीन परिस्थितीत असलेल्या कुटुंबांना तातडीने आर्थिक मदतीची गरज असते. पारंपरिक पद्धतीत अनेक स्तरांवर मंजुरी घेतली जात असल्याने विलंब अपरिहार्य ठरतो. परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा काही मिनिटांत अर्जाची छाननी करू शकते, जोखीम तपासू शकते आणि कर्ज मंजुरीबाबत प्राथमिक निर्णय देऊ शकते. यामुळे वेळ, मनुष्यबळ आणि खर्च यांची मोठ्या प्रमाणावर बचत होऊ शकते. शिवाय भ्रष्टाचार, पक्षपात किंवा मानवी चुकांची शक्यता कमी करण्यासही मदत होऊ शकते. तथापि, या बदलाचा दुसरा पैलूही दुर्लक्षित करता येणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता जितकी उपयुक्त आहे, तितकीच ती धोकादायकही ठरू शकते, जर तिचा वापर जबाबदारीने केला गेला नाही तर. एखाद्या व्यक्तीचे आर्थिक वर्तन, मोबाईल वापर, वैयक्तिक माहिती किंवा सामाजिक सवयी यांचे विश्लेषण करताना गोपनीयतेचा प्रश्न अत्यंत गंभीर ठरतो. नागरिकांची माहिती सुरक्षित राहणार का, तिचा गैरवापर होणार नाही ना, ही चिंता योग्यच आहे. ग्रामीण भागातील अनेकांना डिजिटल साक्षरतेचा अभाव असल्याने ते नकळत फसवणुकीचे बळी ठरू शकतात. काही कंपन्या आकर्षक संदेश पाठवून झटपट कर्ज देण्याचे आमिष दाखवतात आणि नंतर जादा व्याजदर किंवा मानसिक त्रास देतात. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून चालणाऱ्या वित्तीय व्यवहारांवर कठोर नियंत्रण आणि स्पष्ट कायदे आवश्यक ठरतात. याशिवाय, यंत्रणा ज्या माहितीवर काम करते ती माहिती चुकीची किंवा अपुरी असल्यास निर्णयही चुकीचे होऊ शकतात. एखाद्या प्रामाणिक व्यक्तीला कमी गुणांकन मिळू शकते, तर काही वेळा फसवणूक करणारे लोक तांत्रिक पळवाटा शोधू शकतात. त्यामुळे केवळ यंत्रांवर अवलंबून राहून चालणार नाही. मानवी देखरेख आणि सामाजिक संवेदनशीलता तितकीच आवश्यक राहील. विशेषतः भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात प्रत्येक व्यक्तीची आर्थिक परिस्थिती एकसारखी नसते. काही वेळा गरिबी, नैसर्गिक आपत्ती किंवा वैद्यकीय संकटामुळे आर्थिक अडचणी निर्माण होतात. अशा वेळी केवळ आकडे पाहून निर्णय घेणे अन्यायकारक ठरू शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कर्जप्रक्रिया अधिक लोकाभिमुख होऊ शकते, यामध्ये शंका नाही. परंतु त्यासाठी तंत्रज्ञानासोबत नैतिकता, पारदर्शकता आणि सामाजिक जबाबदारी यांची जोड आवश्यक आहे. बँका, सहकारी संस्था आणि शासन यांनी नागरिकांचा विश्वास जपणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः ग्रामीण भारतात डिजिटल साक्षरता वाढवणे, सुरक्षित व्यवहारांची माहिती देणे आणि लोकांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे गरजेचे आहे.

# स्व. विलासराव देशमुख जनतेसाठी सतत काम करणारे नेते - डॉ. सुधीर तांबे

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)- स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्यावर भावाप्रमाणे प्रेम केले. लातूर नंतर संगमनेरच्या विकासाला प्राधान्य दिले. त्यांची व माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांची जनतेप्रति बांधिलकी व कार्यशैली सारखी आहे. ते संगमनेरकरांच्या कायम हृदयात असून स्वर्गीय विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे कर्तबगार मुख्यमंत्री होते असे गौरवउद्गार जयहिंद लोकचळवळचे संस्थापक मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांनी काढले आहे.

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथे स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी नवनाथ आरगडे, सुभाष सांगळे, सुधाकर जोशी,ड.त्रंबक गडाख, ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप जोशी, बाळासाहेब पवार, बाळासाहेब गायकवाड, भास्कर शर्माळे, जावेद शेख,सौ.अनिता दिघे,सौ.शितल उगलमुगले,अमित गुंजाळ, तात्याराम कुटे, ड.प्रमोद कडलग,रामनाथ कु-हे यांच्यासह विविध कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा.आ.डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, विलासराव देशमुख हे महाराष्ट्राच्या राजकारणातील बहुआयामी व्यक्तिमत्व होते. लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे वर त्यांचे विशेष प्रेम होते. ते मुख्यमंत्री असताना लातूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपदाची जबाबदारी त्यांनी थोरात साहेबांना दिली. दोघांची जनमानसाप्रती असलेली तळमळ आणि कार्यशैली सारखी आहे. विचार जुळत होते. शेतकरी व सर्वसामान्य माणूस केंद्र म्हणून त्यांनी कायम त्यांच्या विकासाला प्राधान्य दिले. संगमनेर तालुक्यावर त्यांनी विशेष प्रेम केले. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मागणीवरून संगमनेर शहरासाठी निळवंडे धरणातून थेट पाईपलाईन योजना अगदी दोन मिनिटांमध्ये त्यांनी मंजूर करून दिली. काँग्रेस पक्ष अडचणीत असताना त्यांच्या नेतृत्वाची उणीव कायम भासत आहे.

विलासराव देशमुख यांचे रुबाबदार आणि प्रसन्न व्यक्तिमत्व, प्रभावी भाषण करण्याची पद्धत, सर्वसामान्य प्रति असली तळमळ, हजरजबाबीपणा, राजकारण विरहित सर्व नेत्यांशी असलेले त्यांचे प्रेमाचे संबंध होते. त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात दिलेले योगदान मोठे असून ते महाराष्ट्राचे अत्यंत लोकप्रिय व कर्तबगार मुख्यमंत्री होते असे त्यांनी म्हटले आहे. तर नवनाथ आरगडे म्हणाले की, काँग्रेसचे विचार, परंपरा ही विलासराव देशमुख यांनी महाराष्ट्रात रुजवण्यात मोठा वाटा उचलला त्यांचे योगदान महाराष्ट्राच्या कायम स्मरणात राहील तर सुभाष सांगळे म्हणाले की, विलासराव देशमुख यांचे नेतृत्व तरुणांसाठी कायम प्रेरणादायी आहे. त्यांची भाषणे आणि व्यक्तिमत्व हे तरुणांसाठी कायम स्फूर्तीदायी असल्याचे ते म्हणाले. यावेळी शहर व तालुका विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या संपूर्ण देशामध्ये अर्थव्यवस्था ढासळली आहे. पेट्रोल - डिझेल सह इंधनाची भरमसाठ दरवाढ झाली आहे. महागाई वाढली आहे. बेरोजगारी वाढली आहे. शेतकरी व सर्वसामान्य माणूस अस्वस्थ आहे. शेतकऱ्यांना दिलासा देणे हि सरकारची जबाबदारी आहे. मात्र सध्याचे केंद्र व राज्य सरकार उदासीन आहे. याउलट स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या नेतृत्वात काँग्रेस आघाडी सरकारने कायम शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य व्यक्तींच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. अत्यंत हसतमुख व्यक्तिमत्व लाभलेले विलासरावजी हे महाराष्ट्राचे अत्यंत लोकप्रिय मुख्यमंत्री होते असे गौरवउद्गार माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

## शंकर-पार्वतीच्या विवाहाने खांडगावात भक्तीचा जल्लोष

युवावार्ता (प्रतिनिधी)

शुभमंगल सावधान या मंगलाष्टकाच्या स्वरात आणि अक्षताच्या शुभ वर्षांमध्ये भगवान शंकर आणि माता पार्वती यांचा शुभविवाह भक्तीमय वातावरणात पार पडला. गेली सात दिवसापासून सुरू असलेल्या शिव पुराण महाकथेमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

शंकर-पार्वतीच्या विवाह सोहळ्याने उपस्थित सर्वजण भारावून गेले. संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथील ओम इच्छापूर्ती कपालेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने सात दिवस मनोहर महाराज शिनारे यांच्या संगीत मय व रसाळ वाणीतून शिवपुराण महमहाकथा आयोजित करण्यात आली होती. या कथेमध्ये सिनारे महाराजांनी गेली तीन दिवसापासून भगवान शिव शंकर आणि माता पार्वतीच्या विविध लीलांचे प्रभावी दर्शन भाविकभक्तांना घडले. अजून चार दिवस खांडगावकरांना शिवपुराण महाकथा श्रावण करण्याची संधी मिळणार आहे. या शिवपुराणकथेमध्ये शंकर पार्वतीचा विवाह सोहळा एक आगळे वेगळे आकर्षण ठरले. विशेष भगवान शंकर म्हणून पांडुरंग बालोडे यांचे चिरंजीव अनिकेत व माता पार्वती म्हणून शिवाजी गुंजाळ यांची कन्या सपना या शंकर-पार्वती यांचा शुभ मंगल सावधान सोहळा मंगलाष्टकांच्या स्वरात व अक्षतांच्या शुभवर्षावामध्ये भक्तिमय वातावरणामध्ये पार पडला. यावेळी आ. अमोल खताळ यांनी शुभाशीर्वाद दिले. यावेळी उपस्थित भाविकांनी टाळ्या वाजवत हर हर महादेवचा जयघोष केला तर महिला तरुणींनी फुगडी खेळण्याचा तसेच महिला- पुरुषांनी नाचण्याचा आनंद लुटला. त्यामुळे संपूर्ण परिसरा मध्ये भक्ती, शक्ती आणि श्रद्धा याचा तिहेरी संगम झाला होता.

**सध्याच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात अध्यात्माची नितांत गरज निर्माण झाली आहे. अशा काळात सुरू असलेल्या शिवपुराण महाकथेच्या माध्यमातून भाविकांना नवचैतन्य, मानसिक समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळत आहे. अखंड हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन, दिंडी आणि वारकरी संप्रदायाची परंपरा जपण्याचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे मोठे काम या महाकथेच्या माध्यमातून होत आहे.**

**आ.अमोल खताळ पाटील**
**संगमनेर,**

## शेतकरी संरक्षण ...

पान १ वरून -

डॉ. मुकुंदराव गायकवाड यांनी पुण्यातील ग्रंथालयात अभ्यास करून जागतिक स्तरावरील कृषी संरक्षण व्यवस्थेचा सखोल संदर्भीय अहवाल तयार केला. प्रदेशाध्यक्ष अशोक सब्बन यांनी हा मसुदा देशाचे पंतप्रधान, नीती आयोग, केंद्रीय कृषिमंत्री, मुख्यमंत्री, राज्य कृषिमंत्री तसेच कृषी मूल्य आयोगाकडे सादर करण्यात यावा, अशी विनंती ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्याकडे केली.

अण्णा हजारे यांनी बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवून शेतकरी प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन केले. केंद्र व राज्य सरकारच्या शेतीविषयक धोरणांमध्ये बदल करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच हा मसुदा संबंधित सर्व शासकीय स्तरांवर पाठविण्यासंदर्भात सकारात्मक आश्वासन दिले. यावेळी कार्लस साठे, नितीन भालेराव तसेच उपस्थित शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य सरकारने शेतकरी संरक्षण कायदा तातडीने लागू करावा, अशी मागणी केली. शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणी आणि आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर हा मसुदा तातडीने स्वीकारण्याची आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## विठ्ठल मंदिर समाधी...

पान १ वरून - दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष करून ३० मे रोजी कार्यक्रमास परवानगी दिल्यास, ह.भ.प. किसन महाराज हारदे शिष्य मंडळाचे पदाधिकारी, विठ्ठल मंदिराचे भक्तगण आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येऊन लोकशाही मार्गाने तीव्र निषेध आंदोलन करतील, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस प्रशासनच जबाबदार राहील, असे निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर भारत ताजणे, सुभाष ताजणे, शाम अभंग, चंद्रकांत देशमुख, सोपान गाडेकर, नंदू शिंदे, रामनाथ बाळसराफ, अमोल ताजणे, संजय अभंग, केतन मंडलिक, बाळासाहेब अभंग, मारुती अभंग आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. सध्या या संवेदनशील प्रकरणामुळे विठ्ठलनगर परिसरात चर्चेला उधाण आले असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण संगमनेर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात काँग्रेस पक्षाचे मुंबईत आंदोलन व रास्ता रोको

मुंबई (वृत्तसंस्था)

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने पेट्रोल, डिझेल, एलपीजी व सीएनजीमध्ये भरमसाठ दरवाढ करून सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. महागाईने पिचलेल्या जनतेला इंधन दरवाढ करून मोदी सरकारने महागाईच्या खाईत लोटले आहे. भाजपा सरकारने केलेल्या या महागाई विरोधात प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्त्वाखाली दादर येथील इंडिया बुल्स समोर आंदोलन केले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी रास्ता रोको करून लोकांना मेलोडी चॉकलेट वाटप केले तसेच नरेंद्र मोदी सरकार व फडणवीस सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पेट्रोल नाही, डिझेल नाही, सिलेंडर गायब आहे, इंधनाच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत, शेतमालाला भाव नाही, जनता हवालदिल आहे पण भाजपा सरकार मात्र मस्तीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशासाठी पनौती आहेत, ते सत्तेत आल्यापासून देशातील जनतेवर वरवंटा फिरवत आहेत. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे धादांत खोटे बोलत आहेत. पेट्रोल डिझेलचा मुबलक साठा आहे असे जर त्यांना वाटत असेल तर जनता भर दुपारी कडक उन्हात पेट्रोल पंपावर काय ऊन खायला रांगा लावत आहेत का, कोणी साठेबाजी केली असे त्यांना वाटत असेल तर कारवाई केली पाहिजे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कार
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक, अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाट्याला तीन दशकांची

BiZ INTERNATIONAL FLUSH DOORS BLOCK BOARDS PLYWOODS
WALK-IN INTERVIEW
BiZ International कंपनीच्या ऑफिस व फॅक्टरीसाठी खालील पदांची त्वरित भरती करणे आहे
1 Sales & Service Coordinator (संगमनेर ऑफिस) — Exp: 1-2 Years (Office Admin); Skills: MS Office, Customer Handling, Lead Generation; Edu: Graduation / Diploma
2 Service Coordinator (पुणे लोकेशन) — Education: Graduate / Diploma; Experience: 1-2 Years (Service/Client Coordinator); Skills: MS Office, Good Communication, Customer Service
3 Purchase Entry Executive (कोणताही पदवीधर) — Education: Any Graduate; Experience: 1-2 Years (Data/Purchase Entry); Skills: MS Excel, Computer Typing, Accuracy
कामाचे ठिकाण / पत्ता: ऑफिस ऑफिस अँड फॅक्टरी: प्लॉट नं. ६८, संगमनेर को-ऑप इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे-नाशिक हायवे, संगमनेर - ४२२६०५.
संपर्क (Call us): 8668697302 8888801889
GROW YOUR CAREER WITH BIZ INTERNATIONAL | GREAT WORK ENVIRONMENT & LEARNING OPPORTUNITIES | BE A PART OF OUR SUCCESS STORY

प्रतीक परिपूर्णतेचे शुद्धता अशी घरचीच जशी
GAGANGIRI PACKAGED PURITY
SR THORAT DAIRY
www.gagangiri.co.in
S.R.THORAT MILK PRODUCTS PVT. LTD. (AN ISO 9001, ISO 22000 & HACCP CERTIFIED COMPANY)
Rajapur Road, Sangamner - 422605 Dist:- Ahmednagar, Maharashtra

AMRUTA TEA
FIRST CLASS फर्स्ट क्लास CHAI
MALPANI
Exclusive OFFER
50g फर्स्ट क्लास चहावर स्टील ग्लास (MRP ₹65/-) FREE
500g फर्स्ट क्लास चहावर झोला बॅग (MRP ₹80/-) FREE
फर्स्ट क्लास चहावर स्टेनलेस स्टील पावभाजी प्लेट (MRP ₹175/-) FREE
मालपाणी उद्योग समूहाचे विश्वसनीय उत्पादन!

पाहिजेत
होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत
इंग्रजीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
9730042410

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

पाहिजेत
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. असिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

# वैभवचा विक्रमांचा महाविस्फोट

## वैभव सूर्यवंशीचे विक्रम...

**१६ चेंडू – आयपीएल प्ले ऑमधील वेगवान अर्धशतकाशी बरोबरी ( सुरेश रैना – १६ चेंडू वि. पंजाब किंग्स, २०१४) ८ षटकार – आयपीएलच्या एका डावात पहिल्या सहा षटकांत सर्वाधिक ८ षटकारांचा वर्ल्ड रेकॉर्डही नावावर, ६१ षटकार – आयपीएलच्या एका पर्वात सर्वाधिक षटकारांचा ख्रिस गेलचा ( ५९) विक्रम मोडला, १२ षटकार – आयपीएल प्लेऑफमध्ये एका डावात सर्वाधिक १२ षटकारांचा विक्रम, शुभमन गिलचा ( १० वि. मुंबई, २०२३) विक्रम मोडला. ४ – आयपीएलच्या सर्वाधिक ४ डावांत १० पेक्षा अधिक षटकार मारण्याच्या ख्रिस गेलच्या विक्रमाशी बरोबरी.**

जयपूर (वृत्तसंस्था)

राजस्थान रॉयल्सचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने एलिमिनेटर सामन्यात अक्षरशः विक्रमांचा पाऊस पाडला. त्याने २९ चेंडूंत १२ षटकार व ५ चौकारांसह ९७ धावांची खेळी करताना एका डावात तब्बल ९ मोठे विक्रम आपल्या नावावर केले. त्याच्या तुफानी खेळीमुळे राजस्थानला दमदार सुरुवात मिळालीच, शिवाय ऑरेंज कॅपवरही त्याने कब्जा केला. वैभवने आयपीएलच्या प्लेऑफमधील सर्वात वेगवान अर्धशतकाच्या विक्रमाशी बरोबरी केली. एका हंगामात सर्वाधिक षटकार, सर्वात कमी वयात ६०० धावा, पॉवरप्लेतील धडाकेबाज फटकेबाजी असे अनेक पराक्रम त्याने नोंदवले. वैभव सूर्यवंशीने आयपीएल इतिहासातील अविस्मरणीय खेळी एलिमिनेटर सामन्यात केली. त्याने सनरायझर्स हैदराबादच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला आणि षटकारांचा पाऊस पाडून अनेक विक्रम नावावर केले. त्याने २९ चेंडूंत ५ चौकार व १२ षटकारांसह ९७ धावा कुटल्या आणि आयपीएल इतिहासातील सर्वात वेगवान शतकाच्या विक्रमापासून थोडक्यात हुकला. आयपीएलच्या एका पर्वात पहिल्या सहा षटकांत सर्वाधिक धावांचा विक्रमही वैभवने नावावर केला. त्याने या पर्वात आतापर्यंत ४९० धावा केल्या आहेत आणि डेव्हिड वॉर्नरचा ४६७ धावांचा ( २०१६) विक्रम आज मोडला

## २९ चेंडूत ९७ धावांनी आयपीएल हादरले

गेला.वैभवने पहिल्या षटकाचा शेवटचा चेंडू षटकार भिरकावून पॅट कमिन्सला आश्चर्यचकीत केले आणि इशान मलिंगाच्याही षटकाचा शेवटचा चेंडू त्याने पूल शॉटने सीमापार पाठवला. वैभवने हा झंझावात कमिन्सच्या पुढील षटकात कायम राखताना तीन षटकार खेचले आणि आयपीएलच्या या पर्वात ६०० धावांचा टप्पा ओलांडला. आयपीएल इतिहासात एका पर्वात ६०० धावा करणारा तो युवा फलंदाज ठरला. त्याने रिषभ पंतचा ( २० वर्ष व २१८ दिवस,दिल्ली) २०१८ सालचा विक्रम मोडला. याशिवाय वैभवने आजच्या सामन्यात सात षटकार खेचून आयपीएल इतिहासात एकाच पर्वात सर्वाधिक ६० षटकारांचा वर्ल्ड रेकॉर्डही नावावर केला.

# पेट्रोल-डिझेलनंतर आता CNG चा भडका

मुंबई (वृत्तसंस्था)

देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे आधीच नागरिक त्रस्त असताना आता सीएनजीच्या दरवाढीने सर्वसामान्य वाहनधारकांची चिंता आणखी वाढली आहे. गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर वारंवार वाढल्यानंतर आता सीएनजीचे दरही भडकले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरसह अनेक शहरांमध्ये सीएनजीच्या किंमतीत वाढ झाल्याने रिक्षा, टॅक्सी आणि खासगी वाहनांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांच्या मासिक बजेटवर मोठा परिणाम होणार असल्याचे चित्र आहे.

पुण्यात एमएनजीएल कंपनीने सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपये ५० पैशांची वाढ जाहीर केली आहे. त्यामुळे शहरातील सीएनजीचा दर ९२ रुपये २५ पैशांवरून थेट ९४ रुपये ७५ पैशांवर पोहोचला आहे. वाढीव दर २७ मेच्या मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले. इनपुट गॅसचा खर्च वाढल्यामुळे ही दरवाढ करावी लागल्याचे स्पष्टीकरण कंपनीकडून देण्यात आले आहे. या वाढीचा थेट परिणाम रिक्षा, टॅक्सी चालकांसह दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांवर होणार आहे. प्रवासखर्च वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा कात्री लागणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्येही सीएनजीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. शहरातील चिकलठाणा परिसरातील बीपीसीएल पंपावर सीएनजीचे दर किलोमागे २ रुपयांनी वाढले आहेत. गेल्या १५ दिवसांत येथे सीएनजीच्या किंमतीत १२ रुपयांची वाढ झाल्याने वाहनधारक संतप्त झाले आहेत. शहरात सध्या पेट्रोलचा दर ११२ रुपये ८८ पैसे प्रति लिटर, तर डिझेलचा दर ९९ रुपये ५० पैसे इतका आहे. पेट्रोल-डिझेलनंतर आता सीएनजीही महाग झाल्याने पर्यायी इंधनाचा फायदा कमी होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

नाशिकमध्येही सीएनजीच्या दरात वाढ झाली असून प्रति किलो १ रुपया ३५ पैशांची वाढ नोंदवली गेली आहे. त्यामुळे शहरात सीएनजीचा नवा दर ९६ रुपये ५० पैसे प्रति किलो झाला आहे. यापूर्वी वाहनधारकांना ९५ रुपये १५ पैशांमध्ये सीएनजी उपलब्ध होत होते. २८ मेपासून नवीन दर लागू करण्यात आले आहेत. आखाती भागातील युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधन दरवाढ याचा परिणाम आता सीएनजीवरही होत असल्याचे बोलले जात आहे.

# पिनराई विजयन यांच्या निवासस्थानी ईडीच्या धाडीविरोधात माकप आक्रमक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) अर्थात माकपने केरळचे माजी मुख्यमंत्री तथा पक्षाच्या पॉलिट ब्युरोचे सदस्य कॉम्रेड पिनराई विजयन यांच्या निवासस्थानी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) टाकलेल्या धाडीच्या निषेधार्थ राजधानी दिल्लीत ईडी मुख्यालयावर जोरदार निदर्शने केली. केंद्र सरकारकडून केंद्रीय तपास यंत्रणांचा होत असलेला कथित गैरवापर आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांना लक्ष्य करण्याच्या कारवायांविरोधात पक्षाने तीव्र संताप व्यक्त केला.

या आंदोलनाचे नेतृत्व माकपचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांनी केले. आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी निदर्शकांना रोखत अनेक वरिष्ठ नेत्यांसह शंभरहून अधिक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये वरिष्ठ नेत्या वृंदा करात, पॉलिट ब्युरो सदस्य डॉ. अशोक ढवळे, मरियम ढवळे, विजू कृष्णन, केंद्रीय कमिटी सदस्य विक्रम सिंह तसेच दिल्ली राज्य सचिव अनुराग सक्सेना यांचा समावेश होता. सभेला संबोधित करताना एम. ए. बेबी यांनी केंद्र सरकारवर थेट निशाणा साधत म्हटले की, ईडीची कारवाई ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून राजकीय सूडबुद्धीने प्रेरित मोहिमेचा भाग आहे. न्यायालयांनी वारंवार स्पष्ट केले आहे की, एक्सालॉजिक प्रकरणाशी कॉम्रेड पिनराई विजयन यांचा कोणताही संबंध नाही. तरीदेखील त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. आता त्यांना केवळ वीणाचे वडील असल्यामुळेही लक्ष्य केले जात आहे. ते पुढे म्हणाले की, केरळमधील काँग्रेसचे नवीन मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांच्या दिल्लीतील पंतप्रधानांसोबतच्या बैठकीनंतर लगेचच ईडीची कारवाई होणे हे अनेक गंभीर प्रश्न निर्माण करणारे आहे. ही संपूर्ण कारवाई राजकीयरीत्या आखलेले नाट्य असल्याचा संशय अधिक बळकट होत आहे, असा आरोप त्यांनी केला.

सीएमआरएल डायरी प्रकरणाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, ज्यांची नावे कथितरीत्या या डायरीत आहेत, असे अनेक जण आजही राज्य सरकारमध्ये महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. मात्र त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून केवळ पिनराई विजयन यांनाच सातत्याने लक्ष्य केले जात आहे. त्यामुळे या कारवाईमागील राजकीय हेतू अधिक स्पष्ट होतो. माकपने स्पष्ट केले की, कोणत्याही चौकशी प्रक्रियेत अडथळा आणण्याचा पक्षाचा हेतू नाही. मात्र विरोधी पक्षांना राजकीयदृष्ट्या कमजोर करण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणांचा होत असलेला कथित गैरवापर देशातील लोकशाहीसाठी धोकादायक असल्याचे पक्षाने म्हटले आहे. लोकशाही हक्कांवरील हल्ले, विरोधी पक्षांचे निवडक लक्ष्यीकरण आणि केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापराविरोधात देशभर तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही पक्षाच्या नेत्यांनी दिला.

# राष्ट्रवादी अर्थ खात्यासाठी पुन्हा आग्रही

मुंबई (वृत्तसंस्था)

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांच्याकडे असलेले अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन व्यवस्था होईपर्यंत स्वतःकडे ठेवून घेतले असले तरी सत्तावाटपाच्या सूत्रानुसार हे खाते पुन्हा मिळविणे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांपुढील आव्हान आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महत्त्वाची खाती मिळण्यासाठी प्रयत्न करीत आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्र्यांनी हे खाते स्वतःकडे ठेवून घेतले होते. मात्र आता ते खाते पुन्हा

राष्ट्रवादी काँग्रेसकडे देणे क्रमप्राप्त आहे. मात्र याबाबत अद्यापही महायुतीमध्ये कोणतीही चर्चा नसल्याने पक्षाचे आमदार नाराज आहेत. अर्थखाते हे आमच्या पक्षाचेच आहे. त्यामुळे आम्ही पहिल्या दिवसापासून हे खाते मिळावे यासाठी प्रयत्नशील आहोत. हे खाते मिळावे यासाठी आमचे मागणी आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसमधील एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या शासकीय निवासस्थानी झालेल्या बैठकीत अर्थ खाते पक्षाकडे परत देण्याबाबते होत असलेल्या विलंबाबाबत काही आमदारांनी चर्चा उपस्थित केली. अर्थसंकल्प सादर

करायचा असल्याने ते समजू शकत होते. मात्र चार महिने उलटूनही खाते परत देण्याबाबत कोणतीही हालचाल दिसत नाही, असे एका आमदाराने सांगितले. अर्थ खाते मिळणार नसेल तर त्याऐवजी दुसरे कोणते खाते मिळणार याबाबत स्पष्टता झाली पाहिजे. कारण असे झाले नाही तर पक्ष तडजोडीच्या भूमिकेत असल्याचे चित्र निर्माण होऊ शकते, असे दुसऱ्या एका आमदाराने सांगितले.

दरम्यान, अर्थखाते पुन्हा पक्षाकडे आल्यास कोणाकडे द्यायचे याबाबत पक्षात विचारविनिमय सुरु असून अर्थखात्याचा अनुभव असलेल्या ज्येष्ठ नेत्याच्या नावचा विचार सुरु असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# महाराष्ट्र शासन मोडी अभ्यासक नामिकेवर भारत पडवळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर – महाराष्ट्र शासन भाषा विभागांतर्गत मोडी मजकुराचे मराठी लिप्यंतर करण्यासाठी मोडी अभ्यासकांची नामिका स्थापन करणे कामी शासन स्तरावर विचाराधीन होती शासनाकडे कोट्यावधी कागदपत्र वाचना अभावी मोडी कागद पडुन आहेत. उपलब्ध असलेले मोडी तज्ञ वाचकांची व लिप्यंतर करांची प्रशासकीय, महसुल, शैक्षणिक,अभियांत्रिकी,ईत्यादी मोडी मजकुराचे मराठी लिप्यंतर किंवा इंग्रजीत भाषांतर करण्या करीता आवश्यक्ता असल्याने मोडी वाचन लिखाण करणारांची लेखी व तोंडी परिक्षा घेण्यात आली या परिक्षेत ३० मोडी अभ्यासक उत्तीर्ण झाले.या मोडी अभ्यासकांची महाराष्ट्र शासन भाषा संचालनालय विभागांतर्गत नामिका स्थापन करण्यात आली आहे या शासन स्तरावरील नामिकेवर संगमनेर तालुक्यातील सुकेवाडीतील भारत पडवळ यांची निवड झाली आहे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नाशिक कुंभमेळ्याची मोठी तयारी

## १,१५० एकर जागा संपादित होणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी विकासकामांना मोठी गती मिळाली आहे. विविध ठिकाणी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. अशातच एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात वास्तव्यासाठी साधू-महंतांच्या उभारण्यात येणाऱ्या तपोवनातील साधुग्रामसाठी कायमस्वरूपी जागा संपादित करण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे.

साधुग्रामसाठीच्या भूसंपादनासाठी राज्य शासनाने तब्बल २,२६७ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली असून, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत लवकरच भूसंपादनाची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती समोर येत आहे.प्रयागराज दौऱ्यावरून परतलेल्या अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, यंदाच्या कुंभमेळ्यात भाविक आणि साधू संतांची संख्या गेल्या वेळेपेक्षा अधिक असणार आहे. हि संख्या जवळपास ५ ते १० पटीने वाढण्याची शक्यता आहे. हीच बाब लक्षात घेऊन तसेच भाविकांची , साधू संतांची गैरसोय टाळण्यासाठी महापालिका हद्दीत एकूण १,१५० एकर जागा संपादित करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत साधुग्रामसाठी तपोवनात ३७७ एकर जागेवर आरक्षण टाकण्यात आले आहे. यापैकी ९४ एकर जागा आधीच संपादित झाली आहे. उर्वरित २८३ एकर जागा संपादन करण्याचे काम सुरू आहे. १,१५० एकरपैकी ७०० एकर जागा केवळ कुंभमेळ्यापुरती तात्पुरत्या स्वरूपात अधिग्रहित केली जाणार आहे.माहितीनुसार, महापालिकेने शासनाला पाठवलेल्या प्रस्तावात रस्त्यालगतच्या जमिनींना अधिक दर देण्याचे सुचवले आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर महामार्गालगतच्या जमिनींना सुमारे १५ हजार रुपये, तर महामार्गापासून दूर असलेल्या जमिनींना १२ ते १२.५ हजार रुपये दराने मोबदला देण्याचा प्रस्ताव आहे. शासनाने याच प्रस्तावाला मान्यता देत २,२६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

# अल निनोची चाहूल; मान्सून कमकुवत होण्याची भीती

पॅसिफिक महासागराच्या हवामानावर बारीक लक्ष ठेवणारी जगातील मोठ्या संस्थापैकी एक असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या 'ब्युरो ऑफ मेटिओरोलॉजी'ने एक मोठा आणि धोक्याचा अलर्ट जारी केला आहे. अत्यंत शक्तिशाली'अल निनो' लवकरच आपल्याकडे धडकणार आहे आणि ते आता फार दूर नाही, असे या 'बॉब'ने म्हटले आहे. ऑस्ट्रेलियाच्या 'ब्युरो ऑफ मेटिओरोलॉजी'ने अल निनोचे संकट लवकरच धडकणार असल्याची पुष्टी केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शेतकरी, कृषी संबंधित प्रश्न आणि अल निनोच्या संभाव्य संकटावर चर्चा करण्यासाठी एक तातडीची आढावा बैठक बोलावली.अल निनो म्हणजे नक्की काय? अल निनो हा पॅसिफिक महासागराच्या पाण्यातील असा एक बदल आहे, ज्यामुळे संपूर्ण आशिया खंडातील हवामानाचे चक्र बिघडते. ही गोष्ट आता घडत आहे. जून २०२६ मध्येच अल निनोने आपले भयावह रुप दाखवायला सुरूवात करणार आहे. मान्सून २६ मे पर्यंतच केरळात दाखल होणार होता, पण तो लांबला आहे आणि त्यातच ही बातमी आल्याने हे भारतासाठी चांगले संकेत नाहीत. भयंकर उष्णता आणि पावसाच्या आगमनाकडे लक्ष असताना अल निनोचे आगमन म्हणजे दुष्काळात तेरावा महिना ठरू शकतो.अल निनोमुळे काय होते?अल निनो हे एखाद्या वादळाचे नाव नाही, तर हा एक हळूहळू होणारा पण कोट्यवधी लोकांच्या जगण्यावर गंभीर परिणाम करणारा मोठा बदल आहे. जेव्हा पॅसिफिक महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील पृष्ठभागावरील पाणी गरजेपेक्षा जास्त तापते, तेव्हा ऑस्ट्रेलियापासून ते भारतापर्यंत आणि अमेरिकेपर्यंतच्या वाऱ्यांची आणि पावसाची संपूर्ण दिशा बदलून जाते.पॅसिफिक महासागरात याआधी 'ला निना' (डर छळपर) चा प्रभाव होता. ला निना असणे भारतासाठी फायदेशीरच आहे, कारण त्यामुळे भारतात चांगला पाऊस पडतो. पण तो चांगला काळ फेब्रुवारी २०२६ मध्ये संपला. मे महिन्यापर्यंत पॅसिफिक महासागरातील परिस्थिती

सामान्य होती. पण आता समुद्राच्या पृष्ठभागाखाली उष्णतेचा एक मोठा साठा तयार होत आहे आणि येत्या काही महिन्यांत तो पृष्ठभागावर येण्याचा अंदाज आहे. ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागानुसार, जून २०२६ पर्यंत मध्य आणि पूर्व पॅसिफिकमध्ये गरम पाण्याचे एक मोठे क्षेत्र तयार होईल आणि हेच अल निनो सुरू झाल्याचे मुख्य लक्षण असते.अल निनोबद्दलचा हा अंदाज किती खरा आहे?अमेरिकेच्या नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन या संस्थेने म्हटले आहे की, मे ते जुलै २०२६ या कालावधीत अल निनो येण्याची ८२ टक्के शक्यता आहे. आणि वर्षाच्या शेवटपर्यंत तो टिकून राहण्याची शक्यता तब्बल ९६ टक्के आहे. आणि ही चिंतेची बाब आहे. अल निनो भारतासाठी खरंच चिंतेची बाब आहे का?अल निनोचा परिणाम भारतावरही होतो. भारतात जून ते सप्टेंबर या काळात पडणारा मान्सून आपल्याला वर्षभराचा तब्बल ७० टक्के पाऊस देतो. आपल्या देशातील सुमारे ६० टक्के शेतकरी उन्हाळी पिकांसाठी पूर्णपणे याच पावसावर अवलंबून असतात. आता महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भूतकाळातील आकडेवारी बघितली तर अल निनोच्या काळात मान्सूनचा दुसरा टप्पा नेहमी कमकुवत होतो. म्हणजेच, नेमके ज्या वेळी शेतात उभ्या असलेल्या पिकांना पाण्याची सर्वाधिक गरज असते, त्याच वेळी पाऊस दडी मारतो.उष्णतेची लाट, लांबलेला पाऊस२०२६ हे वर्ष आधीच खूप उष्ण राहिले आहे. देशात सर्वत्र उष्णतेची लाट दिसून आली आहे, अगदी रात्रीच्या वेळीही तापमान कमी होत नसल्याने लोकांना त्रास होत आहे. चोवीस तास उकाडा जाणवत असून, अशात जर अल निनोमुळे मान्सूनचा पाऊस कमी झाला, तर या भयंकर उकाड्यापासून दिलासा मिळण्याची लोकांची शेवटची आशाही संपून जाईल.भारतीय हवामान खात्याने (खचऊ) एप्रिलमध्येच आपल्या दीर्घकालीन अंदाजात इशारा दिला होता की २०२६ चा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहील, ज्याचा सर्वात मोठा फटका शेती क्षेत्राला बसेल आणि परिणामी त्याचा परिणाम इतर क्षेत्रांवरही होऊ शकतो.

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# ना पाणी, ना अन्न; जरांगेंचा निर्धार

## ३० मे पासून रखरखत्या उन्हात आमरण उपोषण

जालना (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी येत्या ३० मे पासून आंतरवाली सराटीत रखरखत्या उन्हात आमरण उपोषण करणार असल्याचं जाहीर केलं आहे. सरकारला गेल्या १० महिन्यांपासून वेळ दिला होता, त्या काळात सातारा गॅझेटिअरवर जीआर काढला गेला नाही असं जरांगे यांनी म्हटले. उन्हात आमरण उपोषणाला बसणार असून मेलो तरी चालेल,

असं मनोज जरांगे म्हणाले. मला चर्चा नकोय, आरक्षणाची अंमलबजावणी पाहिजे, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारला १० महिने वेळ दिल्याचं सांगितलं. माझा नाईलाज आहे, मला कोणाला दोष द्यायचा नाही, आपल्या लेकराला, समाजाला मिळत नसेल तर आपण कठोर भूमिका घेणं गरजेचं आहे. मी सीमारेषेवर आलेलो आहे, ३० मे चं आमरण उपोषण ठरवलं आहे, त्यात बदल केला आहे. आमरण उपोषण सावलीत, मंडपात, फॅनमध्ये आपण ते करत होतो, सगळे तसेच करतात. मला अंतिम टोकाचं आणि कठोर आमरण उपोषण करायचं आहे, रखरखत्या उन्हात हे उपोषण बाज टाकून करणार आहे. ना कुठलं पाणी, ना कुठलं जेवण, ना पायात चप्पल घालणार, असं मनोज जरांगे म्हणाले.

माझ्या शरीरात प्रचंड वेदना आहेत, या जीवाला तरसाचं किती दिवस, जे काही होईल ते होईल, उष्माघाताचा बळी गेला तर देवेंद्र फडणवीसांमुळं गेला, सरकारमुळं गेला. कितीही जीवाची लाही लाही झाली तरी हरकरत नाही, कारण माझ्या समाजाच्या लेकरांच्या आयुष्याचा उन्हाळा झालाय, तर आपण आपली कदर का करायची, असं मनोज जरांगे म्हणाले.

आमरण उपोषण कुठेही होईल, जंगलात होईल, रानात होईल, कडक उन्हात ते उपोषण होईल यावर मी ठाम आहे. किती वेदना होतील याचा विचार करायचा नाही हे ठरवलं आहे. सारखी सारखी उपोषणं करुन जीवाला वेदना होत आहेत. एकदा तुकडा पडूदेत, सरकारचा तुकडा पडेल किंवा माझा तुकडा पडेल. हे आंदोलन सुरु आहे त्याला तीन वर्ष झालेत. मे महिन्याच्या कडक रखरखत्या उन्हात हे आमरण उपोषण होणार आहे, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. माझ्या समाजाच्या लेकराचा उन्हाळा होतोय, ते कुठेतरी थांबलं पाहिजे. आमरण उपोषण फायनल झालं आहे, यात बदल होणार नाही. मराठा समाजानं अंतरवाली सराटीकडे येऊ नये, असंही मनोज जरांगे यांनी आवाहन केलं आहे. देशात इतकं टोकाचं आमरण उपोषण झालं असेल असं वाटत नाही, असंही जरांगे यांनी म्हटलं.

प्रसाद लाड, राधाकृष्ण विखे पाटील येणार की नाही हे मला माहिती नाही. २९ ऑगस्ट पासून उद्या पर्यंत १० महिन्याचा वेळ दिला आहे. हैदराबाद गॅझेटिअरचा जीआर काढला त्यानुसार तुम्ही प्रमाणपत्र देणार आहात का? व्हॅलिडिटी देणार आहात का? मराठ्यांची मतं पाहिजेत,मात्र, मराठ्यांच्या लेकरांना आरक्षण दिलं जात नाही. ही दुटप्पी भूमिका आहे.

# दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्सकडून पद्मश्री सन्मानित

## सुप्रसिद्ध तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांचा गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राच्या लोककला परंपरेला राष्ट्रीय स्तरावर मानाचा तुरा मिळवून देणारे सुप्रसिद्ध तमाशा कलावंत तथा सोंगाड्या म्हणून ओळख असलेले पद्मश्री श्री. रघुवीर खेडकर यांचा दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्स, संगमनेर यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

पद्मश्री. श्री. रघुवीर खेडकर यांचा सन्मान करतांना दंडे गोल्ड अँड डायमंड्सचे संगमनेर शाखेचे ब्रांच मॅनेजर श्री. सुनील वानखेडे व इतर कर्मचारी.

लोककला, तमाशा आणि पारंपरिक विनोदशैली जपत अनेक दशकांपासून महाराष्ट्रातील रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या रघुवीर खेडकर यांना भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या अभिमानास्पद यशाबद्दल दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्स परिवाराने त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह तसेच विशेष अभिनंदन पत्र देऊन गौरव केला.

सन १९२७ पासून विश्वासाची परंपरा जपणारे दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्स हे केवळ दागिन्यांचे ब्रँड नसून समाजातील कला, संस्कृती, सामाजिक उपक्रम आणि विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना नेहमीच प्रोत्साहन देणारे नाव म्हणून ओळखले जाते. समाजातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा गौरव व्हावा, नव्या पिढीला प्रेरणा मिळावी आणि आपल्या संस्कृतीला चालना मिळावी या उद्देशाने दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्स वेळोवेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करत असतात.

यावेळी दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्सच्या प्रतिनिधींनी सांगितले की, रघुवीर खेडकर यांनी लोककलेच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती आणि तमाशा परंपरा जिवंत ठेवण्याचे मोलाचे कार्य केले आहे. त्यांचा सन्मान म्हणजे संपूर्ण संगमनेर आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे.

रघुवीर खेडकर यांनीही या सन्मानाबद्दल दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्स परिवाराचे आभार मानत, लोककलेला मिळणारे प्रेम आणि पाठबळ हेच कलाकारांची खरी प्रेरणा असल्याचे सांगितले. या प्रसंगी उपस्थित दंडे गोल्ड ॲण्ड डायमंड्स च्या कर्मचाऱ्यांनी रघुवीर खेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# वीज पडून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पठार गावअंतर्गत येणाऱ्या दगडसोंडवाडी येथे बुधवारी (दि. २७ मे) दुपारी सुमारे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास वीज पडून एका ३५ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. मच्छिंद्र झुंबर दुधवडे असे मृत तरुणाचे नाव आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मच्छिंद्र दुधवडे हे खंडेरायवाडी परिसरात शेतीकाम करत होते. बुधवारी दुपारी ते आपल्या दगडसोंडवाडी गावी आले होते. याचदरम्यान साकूर परिसरातील अनेक भागात अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. तसेच विजांचा कडकडाटही सुरू होता. यादरम्यान नागरीकांची, शेतकऱ्यांची एकच धावपळ सुरू होती. याचवेळी दुचाकी चिखलात अडकू नये म्हणून मच्छिंद्र दुधवडे हे शेतातील रस्त्याने दुचाकी बाहेर काढत होते. मात्र त्याचवेळी अचानक त्यांच्या अंगावर वीज कोसळली. या दुर्घटनेत मच्छिंद्र दुधवढे यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

या दुर्दैवी घटनेमुळे दगडसोंडवाडीसह हिवरगाव पठार परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.


INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता-
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दुर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70%
डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25